महाराष्ट्र पोलीस

महाराष्ट्र शासन

दुरध्वनी : - ०२४६२-२१६३१६
E-mail Id- ig.nandedrange@gmail.com

नियंत्रण कक्षः - ०२४६२-२१६२५३
पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड-४३१६०३

जा.क्र.पोउपमनि/आस्था-२/स.सा.ब-२०२५ /कश्रेलि/ २०२५/ दिनांक:- ३०/०५/२०२५ 30 MAY 2025

वाचा :- १. महाराष्ट्र शासकिय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकिय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम - २००५ दिनांक २५.०५.२००६.

२. महाराष्ट्र शासकिय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकिय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम - २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश क्रमांक ६, दिनांक २९.०८.२०२४

## -: आदेश :-

महाराष्ट्र शासकिय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियम आणि शासकिय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) व ४(५) नुसार आणि शासन अधिसूचना, गृह विभाग क्र.टीआरएन/०३११/ १३३५/प्र.क्र.२९१/पोल-५ब, दि.२९.०३.२०११ अन्वये दिलेले अधिकार आणि शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.२६/१२ दि.३१.०१.२०१४ मधील तरतूदीनुसार स्थापन केलेल्या नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी विचारात घेवुन नांदेड परिक्षेत्रातील जिल्हा लिपीक संवर्गातील खालील नमुद **कनिष्ठ श्रेणी लिपीकांनी** सध्याच्या कार्यालयातील विहीत कालावधी पुर्ण केल्यामुळे त्यांची **प्रशासकिय** कारणास्तव त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये बदली करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कनिष्ठ श्रेणी लिपीक यांचे नाव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | बदलीवरील नवीन नेमणुकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्रीमती सुनंदा सुधिर केंद्रे | पो.अ.कार्यालय, लातूर | प्राचार्य, पो.प्र.केंद्र, लातूर |
| २. | श्री. सदबा हैबती काळे | पो.अ.कार्यालय, हिंगोली | पो.अ.कार्यालय, परभणी |
| ३. | श्री. सतीष मोहनराव अंकलकोटे | पो.अ.कार्यालय, लातूर | एक वर्ष मुदतवाढ |
| ४. | श्री. प्रविण नाथा वायाळ | पो.अ.कार्यालय, परभणी | एक वर्ष मुदतवाढ |
| ५. | श्री. अशोक सिताराम सातव | पो.अ.कार्यालय, नांदेड | पो.अ.कार्यालय, परभणी |
| ६. | श्रीमती वनमाला माणिक बडे | पो.अ.कार्यालय, लातूर | एक वर्ष मुदतवाढ |
| ७. | श्री. दत्तात्रय मारुती क्षिरसागर | पो.अ.कार्यालय, लातूर | एक वर्ष मुदतवाढ |

**२. बदलीच्या आदेशांची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरीता खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.**

- वर नमुद कनिष्ठ श्रेणी लिपीक यांचे बदली बाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर पर्यायी कनिष्ठ श्रेणी लिपीकांची हजर होण्याची वाट न पहाता त्यांच्याकडील प्रलंबित संदर्भ व प्रतिक्षाधिन प्रकरणांची यादी पदमोचक लिपीक वर्गीय कर्मचारी किंवा संबंधीत पर्यवेक्षीय अधिकारी यांचेकडे न चुकता द्यावी व बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करावे.

- कार्यमुक्तीच्या दिनांकानंतर ते बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन त्यांचे वेतन अथवा कोणतेही देयक अदा करु नयेत. बदली नंतर संबंधीत कर्मचारी बदलीच्या ठिकाणी रुजु होत नसेल तर अशा कर्मचाऱ्याविरुध्द नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.
- बदली ही संपुर्णपणे प्रशासकिय स्वरुपाची बाब असल्यामुळे कोणत्याही कर्मचाऱ्याने राजकिय दबाव वापरल्यास महाराष्ट्र नागरी सेवा(वर्तनूक) नियम, १९८१ मधील नियम २३ चा भंग केला म्हणून ती कृती शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहील.
- बदली झालेल्या कनिष्ठ श्रेणी लिपीकांना संबंधीत घटक प्रमुखांनी विनाविलंब कार्यमुक्त करावे व संबंधीत कनिष्ठ श्रेणी लिपीकांना संबंधीत घटक प्रमुखांनी विनाविलंब रूजू करुन घ्यावे. तसेच, ते हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा. एखाद्या कनिष्ठ श्रेणी लिपीकास रुजू करुन न घेतल्यास सक्तिचा प्रतिक्षाकाळ ठरवुन काम न देता वेतन व भत्ते देण्याचा प्रश्न उद्भवल्यास संबंधीत घटक प्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल.
- बदली झालेल्या कनिष्ठ श्रेणी लिपीकांनी त्यांची पदस्थापना केलेल्या कार्यालयात पदग्रहण अवधीतच रुजू व्हावे.
- बदली आदेशानंतर जे कनिष्ठ श्रेणी लिपीक रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील, त्यांना रुग्ण निवेदनाच्या तारखेपासुन स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

**( शहाजी उमाप )**
पोलीस उप महानिरीक्षक,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड.

प्रति,

पोलीस अधीक्षक, नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली.
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, बाभळगाव, लातूर.

**<u>प्रत सविनय सादर</u>**

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई